बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत बालकांसाठी संस्था चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक-बालगृ-२०१९/प्र.क्र.१४/का-०८

नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख-१३ ऑगस्ट, २०१९.

वाचा :-

१.आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचे पत्र क्र.मबाविआ/बावि/का-५/२०१९-२०/प्रलंबित अनुदान/३४१२, दि.५ जुलै, २०१९.

२.शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८ जुलै, २०१९.

३. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. बालगृ-२०१९/प्र.क्र.१४/का-०८, दि.१३ ऑगस्ट, २०१९.

शासन शुध्दीपत्रक :-

संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ "आयुक्त, महिला व बाल विकास, पुण यांनी महिला व बाल विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित बालगृहांच्या सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील प्रलंबित देयकांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सदर स्वयंसेवी संस्थांचे बिनचुक पुर्नमुल्यनिर्धारण करावे. तसेच पुर्नमुल्यनिर्धारण केल्यानंतर स्वयंसेवी संस्थानिहाय किती रक्कम अदा करण्यात आली आहे, त्याचप्रमाणे सदर रक्कम अदा केल्यानंतर प्रलंबित राहणाऱ्या एकूण रकमांची संस्था/ वर्षनिहाय विगत शासनास सादर करुन चालू आर्थिक वर्षाच्या अनुदानाकरिताची संस्थानिहाय मागणी शासनास सादर करावी." ***याऐवजी*** "आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी महिला व बाल विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित बालगृहांना सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील प्रलंबित अनुदान अदा करताना सदर स्वयंसेवी संस्थांचे बिनचुक मुल्यनिर्धारण झाल्याची खात्री करावी. विवरणपत्रातील स्तंभ ४ मधील निधीतून स्वयंसेवी संस्थांना निधी वितरीत केल्यानंतर संस्थानिहाय अदा करण्यात आलेली रक्कम, प्रलंबित रकमांची वर्षनिहाय विगत शासनास सादर करावी. त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षासाठी स्वयंसेवी संस्थांना देय ठरणाऱ्या अनुदानाची संस्थानिहाय मागणी शासनास सादर करावी.", **असे वाचावे.**

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८१३१६२५१८८२३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.08.13 16:30:09 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. मा.मंत्री/ राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांची खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
९. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१०. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
११. सर्व उपसचिव, सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. उपायुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
१३. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-६/ अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
१४. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर निधी बी.डी.एस. प्रणालीवर वितरीत करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
१५. सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती, का-०८.